महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

# कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर.

ग्रँड हॉटेलच्या समोर,शासकीय वसाहत,बार्शी रोड लातूर.

दुरध्वनी क्रं.०२३८२ - २२४०५० email :-csnrhmlatur@rediffmail.com

जाक्र.जिशचिला/ग्रारु/औभां/ 21950 /२०१९ दि.3/9 /२०१९

आरोग्य सेवा **नोटिस बोर्ड**

प्रति,

१)..................
..................
..................

२)....................
....................
....................

३)....................
....................
....................

**विषय** :- Drug For safe Abortion (MMA) करिता अत्यावश्यक औषधांचे दरपत्रक सादर करणे बाबत....

**संदर्भ** :- या कार्यालयाची मंजुर टिप्पणी दिनांक ०९.०९.१९

वरील विषयी अनुसरुन पत्र देण्यात येते की, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय लातुर यांच्या अंतर्गत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय व स्त्री रुग्णालयाकरिता Drug For safe Abortion (MMA) करिता सोबत जोडलेल्या स्पेसीफिकेशन नुसार अत्यावश्यक औषधांची आवश्यकता आहे.सदरील औषधांची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे नोंदणीकृत फर्म कडुन खालील अत्यावश्यक औषधांची दरपत्रक खालील अटी व शर्तीच्या आधीन राहुन मोहोरबंद लिफाफयामध्ये दरपत्रके दि.१६.०९.२०१९ रोजी ११.०० वाजेपर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय लातुर येथे दाखल करण्यात यावे.सदर दरपत्रके दि.१७.०९.२०१९ रोजी १२.०० वाजता उघडण्यात येतील.

**सोबत**:- Drug For safe Abortion (MMA) करिता अत्यावश्यक औषधांची यादी.

**अटी व शर्ती** :-

१) इच्छुकांनी Drug For safe Abortion (MMA) करिता लागणारे अत्यावश्यक औषधांची दर स्वतंत्र दर पत्रके सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावीत.प्रत्येक फर्मला फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी आहे.तसेच दरपत्रके Authorized Distributors , Manufactures ,Wholesale Suppliers यांनी भरावयाची आहेत.

२) जी.एस.टि नं व व्हॅट किलरन्स प्रमाणपत्र व पॅनकार्ड सादर करणे आवश्यक आहे.

३) Drug Lincence , संस्था/ दुकान, विक्रीविषयक नोंदणी दाखला आवश्यक आहे.

४) दरपत्रके पोहोच करणेचे ठिकाण : जिल्हा शल्य चिकित्सक, लातुर कार्यालयात कामकाजाच्या वेळेत (सुट्टीवगळता) दि. १६.०९.२०१९ ( ११.०० वाजेपर्यंत)

५) यादी मधील बाबी आवश्यकते प्रमाणे खरेदी केली जातील.

६) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर पुरवठा केलेल्या मालाच्या बिलामध्ये आपला पॅनकार्ड व जी. एस. टि नं क्रमांक लिहावा. तसेच आयकर, व्यवसायकर इ. तसेच नियमानुसार जे शासकीय कर लागू असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

७) सदर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा हा जिल्हा शल्य चिकित्स्क कार्यालय पर्यंत आणून पोहोच करावा.

८) सोबत जोडलेल्या यादीतील आपण पुरवू शकणा-या अत्यावश्यक औषधांची दर देणे बंधनकारक आहे.तसेच दर MRP पेक्षा जास्त असु नये तसेच सदर उपकरणे व साहित्याचे दरांबाबत राज्य शासन/ केंद शासनाचे सर्व शासननिर्णय व पत्रके पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

९) आपल्या संस्थेचे या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्या बरोबर हितंसंबंध नाहीत या बाबत प्रमाणपत्र दरपत्रकाबरोबर सादर करावे.

१०) औषधांची खरेदी वेळी आवश्यक ती मात्रा गरजेनुसार खरेदी करण्यात येईल सर्व बाबी यादीनुसार खरेदी करणे या कार्यालयावर बंधनकारक नाही.आवश्यकतेनुसार खरेदी केली जातील.

११) एखादे औषधांची अप्रमाणित अथवा खराब आढळल्यास त्याविषयी होणा-या सर्व शासकीय कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील. नवीन बदली करुन दयावे लागल्यास तो पुरवठाविना शर्त व इतर खर्चाशिवाय पुरवठा करणे हे दरपत्रक धारकास बंधनकारक राहील.

१२) यादीमध्ये नमूद करण्यात आलेली अत्यावश्यक औषधांची मागणीनुसार दहा दिवसाच्या आत पुरवठा करण्यात यावीत.दहा दिवसात संबधिताने पुरवठा नाही केल्यास आपणास दिलेले पुरवठा आदेश आपोआप रद्द होतील व आपल्यापेक्षा जास्त दर असलेल्या दोन नंबरच्या पुरवठाधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

१३) निश्चित केलेल्या दराप्रमाणेच देयके तीन प्रती ए-४ साईज मध्ये सादरकरावीत

१४) पुरवठा केलेल्या औषधांची देयके अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा केली जातील

१५) कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, लातुर यांनी राखून ठेवलाआहे.त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही अगर पत्र व्यवहार केला जाणार नाही. दरपत्रकाचा कालावधी १८० दिवसांचा असेल.

जिल्हा शल्य चिकित्सक
लातुर

**प्रत**:- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी,जिल्हा अधिकारी कार्यालय लातुर यांना अत्यावश्यक औषधांची यादी Latur.nic.in लातुर जिल्हयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करणेस्तव सादर.

Drug For safe Abortion (MMA) करिता लागणारे अत्यावश्यक औषधांची यादी.

| Sr no | NAME OF ITEMS | Quantity |
|---|---|---|
| 1 | **Combipack MMA kit (Mifepristone 200 mg + Misoprostal 200 mg)** | **328** |
| **2** | Tab Misoprostal 200 mg | **9150** |

जिल्हा शल्य चिकित्सक
लातुर